क्रमांक : जमीन-२६००/७४७/प्र.क्र.१५३/ज-३.
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २२ फेब्रुवारी २००१.

**विषय :- <u>जमीन - मुंबई उपनगर जिल्हा.</u>**
**मौजे मानखुर्द, स.नं.१३८ न.भू.क्र. १/२ मधील जमीन अण्णाभाऊ साठे नगर येथील रहिवाश्यांना विद्युत पुरवठा करण्यासाठी विद्युत उपकेंद्र उभारण्यास मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस देण्याबाबत........**

**<u>ज्ञापन :-</u>**

जिल्हाधिकारी , मुंबई उपनगर जिल्हा यांना वरील विषयासंबंधीच्या त्यांच्या क्रमांक सी/कार्या-३-डी/ वशी-१८४/ २००० दिनांक ३.६.२००० च्या पत्रासंदर्भात विज्ञप्तिपूर्वक कळविण्यात येते की, मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी यांना अण्णाभाऊ साठे वसाहतीत विद्युत पुरवठा करण्याकरिता विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी मौ. मानखुर्द येथील स.नं. १३८ न.भू.क्र. १/२ मधील औद्योगिक विभागात (I-३) मध्ये समाविष्ट असलेली (सोबत जमिनीचा नकाशा)४०० चौ.फूट जमीन महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण नियम १९७१ मधील नियम ३५ मधील तरतुदीनुसार सदर जमीनीची आजच्या बाजारभावाची किंमत प्रती चौरस फूटास रुपये ६९३/- इतकी मानून या दराप्रमाणे मंजूर जमीनीच्या होणा-या संपूर्ण बाजारभावाच्या किंमतीवर भारतीय स्टेट बँकेच्या त्या त्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या **"प्राईम लेंडिंग रेट"** प्रमाणे होणा-या व्याजाइतके भाडे आकारुन १० वर्षाच्या भाडेपट्ट्याने नेहमीच अटी/ शर्तीवर तसेच खालील अतिरिक्त अटीवर मंजूर करण्यास हरकत नसावी.

**अट :-** जिल्हाधिका-यांनी मंजूर जमीनीची आजच्या बाजारभावाची किंमत सहाय्यक संचालक, नगर रचना यांजकडून निर्धारित करुन घ्यावी. तात्पुरत्या किंमतीपेक्षा अंतिम किंमत अधिक असल्यास फरकाची रक्कम प्रचलित धोरणाप्रमाणे व्याजासह वसूल करावी.

26 FEB 2001
3009



Scanned by CamScanner

३. हे ज्ञापन नगर विकास विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाने त्यांच्या क्रमांक विअप्र१०९२/ प्र.क्र. १४८/९९/ विनिमय, दिनांक १.८.१९९२ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शिवाजी पाटणकर)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

प्रत :-

आयुक्त कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई,
जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
उपसंचालक, भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा अनुज्ञेयता) मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा परीक्षा) मुंबई,
अधिक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई,
सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण मुंबई उपनगर जिल्हा
वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
ज-३ कार्यासन ,महसूल व वन विभाग, निवड नस्ती.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

**प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१**

क्र. :- ३४/३डी/टल-६०७
दिनांक :- 30/3/2001

**वाचले** :- १) वरीष्ठ व्यवस्थापक,(तांत्रिक) मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी यांचे पत्र क्र.ईई-२१८०/इंजी-१६/अआरडी/९९, दिनांक १।११।१९९९.
२) इकडील पत्र क्र.सी/कार्या-३डी/वशि-१८४/२०००, दिनांक ३।६।२०००.
३) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.जमीन-२६००/७४७/प्रक्र.१५३/ज-३, दि.२२।२।२००१.

**आदेश :-**

मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी यांना अण्णाभाऊ साठे नगर वसाहतीत विद्युत पुरवठा करण्यासाठी विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी मौजे मानखुर्द येथील स.नं.१३८, नभूक्र.१ पैं. मधील औद्योगिक विभागात (I-३) मध्ये समाविष्ठ असलेली सोबतच्या नकाशात दर्शविलेली ४००चौ.फूट जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम३५ मधील तरतुदीनुसार सदर जमीनीची आजच्या बाजारभावाची किंमत प्रती चौ.फूटास रु.६९३/- इतकी मानून या दराप्रमाणे होणा-या संपूर्ण बाजारभावाच्या किंमतीवर भारतीय स्टेट बँकेच्या त्या त्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या "प्राईम लेंडिंग" रेट प्रमाणे होणा-या व्याजाइतके भाडे आकारुन १० वर्षाच्या भाडेपट्टयाने खालील अटी/शर्तीवर मंजूर करण्यांत येत आहे.

१) मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस ४००चौ.फूट जमीनीची रु.६९३/- प्र.चौ.फूट या तात्पुरत्या या दराप्रमाणे होणा-या संपूर्ण बाजारभावाच्या किंमतीच्या १२% प्रमाणे होणारी वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम रु.३३,३९६/- या कार्यालयाकडे त्वरीत भरणा करावी.
२) तात्पुरत्या किंमतीपेक्षा अंतिम किंमत अधिक असल्यास फरकाची रक्कम प्रचलित धोरणाप्रमाणे व्याजासह भरावी लागेल.
३) भाडेपट्टयाने दिलेल्या जमीनीचा उपयोग विद्युत उपकेंद्रासाठीच करावा लागेल.
४) मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी पाया व्यतिरिक्त उर्वरित सर्व बांधकाम अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात करील.
५) मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी शासनाचे प्रचलित धोरणानुसार फक्त संरक्षणास पात्र असलेल्या झोपडीधारकांना विद्युत जोडणी देईल.
६) विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी परवानगी देण्यांत येत असलेल्या प्रश्नांकित जमीनीवर कंपनीला कोणताही हक्क सांगता येणार नाही.
७) उपरोक्त अटी/शर्तींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास जमीन सरकारजमा करण्यांत येईल.
८) वरील अटी/शर्ती मान्य असल्यावावत रु.२०/- च्या मुद्रांकित पेपरवरील हमीपत्र कंपनीस या कार्यालयांस सादर करावे लागेल.

...2

Scanned by CamScanner

वर नमूद केल्याप्रमाणे भाडेपट्टयाची रक्कम भरल्यानंतर व हमीपत्र सादर केल्यानंतर जमीनीचा ताबा कंपनीस देण्यांत येईल.

Sd ×××
(चिं.शा.संगितराव)
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

स्थळ प्रतिवर जिल्हाधिकारी
यांची सही असे

प्रति,
वरीष्ठ व्यवस्थापक (तांत्रिक),
मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी,
पोष्ट बॉक्स नं.६८०८,इलेक्ट्रिक हाऊस,
सांताक्रुझ (पूर्व),मुंबई-४०० ०५५.

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) नगर भूमापन अधिकारी चेंबूर
२) तहसिलदार कुर्ला.
३) उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता.

स्थळ प्रतिवर जिल्हाधिकारी
यांची सही असे

30/3/2001
Issued

Scanned by CamScanner